# राजर्षी शाहू महारांजाचा शेतीविषयक दृष्टीकोन , आणि शेतीविषयक केलेल्या कार्याचा आढावा.

**डॉ.स्वाती अशोक माळकर** सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.

---

## प्रस्तावना

२६ जुलै १८७४ मध्ये राजर्षी शाहू महाराजांचा जन्म, कागलच्या घाटगे घराण्यात झाला. १८८४ मध्ये वयाच्या १० व्या वर्षी ते कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक गेले. व पुढे शाहू छत्रपती झाले. गुजरातमधील राजकोट येथे राजकुमार विद्यालयात त्यांचे सुरवातीचे शिक्षण झाले. भारतीय लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे.त्यामुळे शेती क्षेत्राचा विकास झाला तर त्यावरती अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. व त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. म्हणून शाहू महाराजांनी करवीर संस्थानामध्ये अनेक शेतीविषयक सुधारणा केल्या.महाराजांनी शेती क्षेत्राचे महत्व सांगत श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली.तसेच शेती हा उत्पादक व्यवसाय आहे. आणि तो संपत्तीच्या निर्मितीचा प्रमुख स्त्रोत आहे. तसेच शेतीमध्ये श्रम केल्यास श्रमातून संपत्ती निर्माण होते. असे महाराजांचे विचार होते.१९०२ मध्ये इटली या कृषीप्रधान देशाला भेट दिली. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, प्रगत देशाच्या तुलनेमध्ये आपल्या देशाची कृषी उत्पादकता खूप कमी आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिकीकरण करणे आणि शेती व्यवसायाला प्रतिष्टा मिळवून देणे गरजेचे आहे. या दृष्टीकोनातून त्यांनी शेती व शेतकरयासाठी बहुमोल असे कार्य केले आहे.

## राजर्षी शाहूमहाराजांचे शेती विषयक कार्य

### १ शेतीविषयक प्रदर्शन

शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शाहू महाराजांनी शेतीविषयक प्रदर्शने भरविली होती. चिंचली सारख्या ठिकाणी शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. कृषी प्रदर्शनाला भेट दिल्यावरती शेतकरी काही गोष्टी आत्मसात करून स्वताच्या शेतामध्ये प्रयोग ही करायला तयार होतील. अशी अपेक्षा होती. कोल्हापूर संस्थानातील जैन परिषदेने नोव्हेंबर १९०९ मध्ये एक शेतीविषयक प्रदर्शन भरवले होते. यामध्ये शेतीविषयक उत्पादने, अवजारे, स्थानिक तयार केलेले शिवणकाम,विणकाम , भरतकाम हे ठेवण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावरील शेतीविषयक प्रदर्शन एप्रिल १९१४ मध्ये भरले होते. या प्रदर्शनाचे तीन विभाग होते.पहिला विभाग जनावरांचा होता. दुसरा विभाग शेतीविषयक होता. तिसरा विभाग हा कला व ओद्योगिक या घटकांशी संबंधित होता.

### २ आदर्श शेती प्रयोग

शेती संशोधनाला व लागवडीला जोड म्हणून आदर्श शेतीचा ही प्रयोग महाराजांनी केला होता. राजाराम हायस्कूल ला जोडून आदर्श शेतीचा विभाग काढण्यात आला होता.आदर्श शेतीसाठी प्रतिवर्षी १००० रुपयांवरती खर्च होत होते. या आदर्श शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग केले जायचे. यामध्ये भात,ऊस,गहू,कापूस, कडधान्ये, मिरच्या,भुईमुग , इतर भाज्या इ ची लागवड करण्याचे प्रयोग केले जायचे. आलिंगटन नांगर, हँड चॉप कटर इ चा उपयोग आदर्श शेतीसाठी केला जात होता. वेगवेगळ्या खतांचा प्रयोग करण्यात आला.राखेपासून बनवलेले खत,शेणखत,माशांपासून बनवलेले खत,इ. शेती संशोधनाला या आदर्श शेतीवरील प्रयोगामुळे बराच हातभार लागला होता.

### ३.शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले

शेतकऱ्याना जाचक ठरणाऱ्या पतधोरणात शाहू महाराजांनी तातडीने बदल करून शेतकरी सावकरांकडून कर्ज घेत असल्याने आणि अव्वाच्या सव्वा व्याज घेत असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडायचा. म्हणून शाहू महाराजांनी १८९५ मध्ये शेतकऱ्याना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यास सुरवात केली. शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी, विहीर खुदाई करण्यासाठी, बी बियाणे विकत घेण्यासाठी,अशा अनेक कामासाठी महाराजांनी शेतकऱ्यांना बिनव्याजी व अत्यल्प दराने कर्ज उपलब्ध करून दिले.

### ४ शेतीसाठी जलसिंचनाच्या सुविधा

कोल्हापूर संस्थानातील शेत जमीन सिंचन क्षेत्राखाली येण्यासाठी १९०९ मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामाला सुरवात केली.१९१८ सालापर्यंत १४ लाख रुपये खर्च धरण बांधणी साठी आला होता. भक्कम धरणाची निर्मिती महाराजांनी केली होती. धरणाची उंची ३८.४१ मीटर आहे, तर धरणाची लांबी १०३७ मीटर आहे. पाणीसाठा क्षमता हि २३६.७९ दशलक्ष घनमीटर आहे. यामुळे ५९११० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले. या धरणामुळे शेतीला पाणी उपलब्ध झाले. आणि शेती समृद्ध बनली.तसेच रुकडी, वडगाव, सातवे,जोतीबा डोंगर, इ ठिकाणी लहान मोठे बंधारे बांधण्यास सुरवात केली होती. या सर्वामुळे कोल्हापूर संस्थानात कृषी विकासाला चालना व रोजगारांची संधी मध्ये वाढ होण्यास मदत झाली.

### ५. वनोषधी लागवड करण्यास प्रोत्साहन

शेतकऱ्यांनी वनोषधी आणि इमारती लाकडांची लागवड केल्यास उत्पन्न वाढू शकते हे लक्षात आल्यावर महाराजांनी साग,हिरडा, बेहडा,आंबा,फणस,काजू, व इतर वनोषधींची लागवड करण्यासाठी शेतकऱ्याना प्रोत्साहन दिले.

### ६ शेती आधारित उद्योगधंद्याची स्थापना

महाराजांनी शेतीमालावर आधारित एखादा उद्योग कोल्हापुरात काढावयाचा ठरवला होता. १९०६ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सर्वात मोठा कापड निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला होता.त्यादृष्टीने स्पिनिंग अँड विव्हिंग मिलची स्थापना २७ सप्टेंबर १९०६ रोजी केली.शिरगावकर ऑइल मिल, भुईमुगाचे कारखाने, जीनिंग factory,साखर कारखाना, युवराज महाराज ऑइल मिल अशा प्रकारचे लघुउद्योग महाराजांच्या व दरबाराच्या वतीने स्थापन करण्यात आले होते.

७. नवीन पिकांची लागवड

शेती मध्ये उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी पिक पद्धतीत बदल करावा म्हणून शाहू महाराजांनी करवीर संस्थानामध्ये नवीन पिकांचे प्रयोग केले. घाट भागातील जमीन पडीक ठेवण्यापेक्षा त्यामध्ये पिक घ्यावे. व ठेथिल डोंगराळ भागातील लोकांना रोजगारही मिळावा या उदेशाने पन्हाळा येथील पेंढखले या गावी कॉफीची लागवड केली. दोन वर्षांनी भुदरगड येथेही कॉफीची लागवडीचे प्रयोग केले.

त्यांनतर चहाच्या लागवडीकडे महाराजांनी लक्ष दिले. पन्हाळा येथे चहा लागवडीची सुरवात केली. त्याचप्रमाणे पन्हाळा, भुदरगड येथे वेलदोडे,कोको,इंडियन व इतर प्रकारचे रबर, ताग ,बेळगावी बटाटे,लाख इ. लागवडीचे प्रयोग केले. त्याचप्रमाणे बेंगलोरहून रबर व कोको,निल्गीरीहून औषधी वनस्पती, बऱ्हाणपूरच्या बॉटनिकाल गार्डन म्ध्जून मूल्यवान प्रतीचे लाकूड, इ वेगवेगळ्या पिकांची लागवडीचे प्रयोग करवीर संस्थामध्ये करण्यात आले होते.

**सारांश**

शेतीसंदर्भात महाराजांचे असलेले विचार व कार्य खूप मोलाचे आहे.शेतीत आधुनिक तंत्रे, सिंचन सोयी, सुधारित बी बियाणे, शेती संसाधने, कर्जपुरवठा , शेतीविषयक प्रदर्शने इ. सोयी महाराजांनी करवीर संस्थानात उपलब्ध करून दिल्या. भारतात १९६०-६१ मध्ये हरित क्रांतीची सुरवात झाली होती. पण महाराजांनी १८९६ च्या दुष्काळातच करवीर प्रांतात हरित क्रांतीचे प्रयोग करण्यास सुरवात केली होती. हरित क्रांती घडवून आणण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.

शाहू महाराजांनी दूरदृष्टीकोनामधून नियोजनपूर्वक केलेल्या वेगवेगळ्या व सर्वकष सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या व शेतकऱ्यांच्या जीवनावर चांगल्या स्वरूपाचे परिणाम झाले होते आणि आजही त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहे. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जसे वेगवेगळ्या पिकांची लागवड केली. तशी लागवड शेतकरी आजही करताना दिसून येत आहे. शेती आधारित उद्योगधंदे महाराजांनी त्याकाळी उभे करून एक प्रकारची औद्योगिक क्रांतीचा पाया उभा केला होता. तो पाया आजही भक्कम स्वरूपात उभा आहे. आणि आजही या शेती आधारित उद्योगामधून लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे. तसेच जलसिंचन योजना यामध्ये राधानगरी धरण बांधले याचा उपयोग आजही शेती क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. शेती क्षेत्राला या धरणामुळे बारमाही पाणी उपलब्ध झाल्यामुळे पिकांच्या उत्पन्नामध्ये आजही वाढ होत आहे. राधानगरी धरण हे आजही दूरदृष्टीच्या धोरणाचे प्रतिक मानले जाते.राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविषयक आणि जलसिंचन विषयक केलेले कार्य अनमोल असल्याचे दिसून येते.जलसिंचन विषयक असलेल्या आणि कृषी ओद्योगिक धोरणाचा परिणाम संपूर्ण महाराष्ट्रावरती झालेला दिसून येतो.

**संदर्भ**

१. दैनिकप्रभात– विठल वळसे पाटील अभिवादन राजर्षी शाहू महाराज : दूरदृष्टीचा राजा
२. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ
३. आर्थिक विचारांचा इतिहास (पुस्तके)
४. संकेतस्थळ